आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

५ जून २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या निकालांनंतर आता सत्तास्थापनेसाठी हालचालींना वेग
- एनडीएच्या बैठकीत आघाडीचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची सर्वसंमतीनं निवड / काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीची बैठक
- लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारत उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचा इरादा

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे २ हजार ३०३ अंकांची वाढ

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर सत्तास्थापनेसाठीच्या हालचालींना वेग आला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीनंतर मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि प्रधानमंत्रीपदाचा, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा त्यांच्याकडे सुपूर्द केला. राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आणि नवं सरकार स्थापन होईपर्यंत कामकाज पाहण्याची विनंती केली. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी आज १७ वी लोकसभा विसर्जित केली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीनं रणनीती ठरवण्यासाठी एनडीएच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांची बैठक आज नवी दिल्ली इथं झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, लोक जनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान, तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार या बैठकीला उपस्थित होते. एनडीएच्या सर्व घटक पक्षांनी आपली समर्थनपत्रं दिली. तसंच या बैठकीत एनडीएचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची सर्व संमतीनं निवड करण्यात आली. एनडीएच्या संसदीय नेत्याची निवड ७ जून रोजी केली जाणार आहे.

<><><><><>

इंडिया आघाडीची बैठकही आज काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी झाली. तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी, झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना सोरेन, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी, झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी, यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकांच्या काल लागलेल्या निकालावर विविध पक्षाचे नेते प्रतिक्रिया देत आहेत.

भाजपच्या नेतृत्वातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले आणि देशाच्या इतिहासातला हा एक अभूतपूर्व क्षण असल्याची ग्वाही दिली. देशवासीयांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नवी ऊर्जा आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरोधकांना जनतेनं सत्तेपासून दूर ठेवलं, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केलं. जनतेनं भाजपप्रणित एनडीएला स्पष्ट बहुमत दिलं आहे आणि नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा प्रधानमंत्री होत आहेत. महाराष्ट्रात एनडीएला कमी जागा मिळाल्या आहेत, याच्या कारणांचा शोध घेतला जाईल, असंही शिंदे म्हणाले.

सामान्य जनतेची ताकद दाखवून दिल्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. पक्षाचं वेगळं नाव आणि चिन्हावर निवडणूक लढवूनही आपल्या पक्षानं चांगली कामगिरी केल्याचं ते मुंबईत वार्ताहर परिषदेत म्हणाले. इंडिया आघाडीच्या बैठकीला आपण जाणार असल्याचं सांगून इंडिया आघाडीनं सरकारस्थापनेचा दावा करावा, असंही ठाकरे यांनी सुचवलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हा नैतिक पराभव स्वीकारावा आणि तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहे. भाजप ४०० पेक्षा जास्त जागा जिंकेल, असा दावा त्यांनी प्रचारादरम्यान केला होता, पण स्वबळावर बहुमताचा आकडा गाठण्यातही त्यांना अपयश आलं, असं ममता यांनी वार्ताहर परिषदेत नमूद केलं.

**<><><><><>**

राज्यसभेचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेली जागा भरण्यासाठी पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी १३ जूनपर्यंत अर्ज दाखल करता येतील. अर्जांची छाननी १४ जून रोजी होणार आहे. अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख १८ जून असेल. या पोटनिवडणुकीसाठीचं मतदान २५ जून रोजी होईल, असं महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कळवलं आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाच्या पराभवाची जबाबदारी आपण घेत असून, आता पक्षात पूर्णवेळ काम करण्यासाठी उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करावं, अशी विनंती आपण पक्ष नेतृत्वाला करणार आहोत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

सत्तेत आल्यानंतर भाजपा संविधान बदलेल असा प्रचार विरोधकांनी केला. या प्रचाराला प्रत्युत्तर देण्यात आपण कमी पडलो, असं फडनवीस म्हणाले. शेतकऱ्यांचे प्रश्न, मराठा आरक्षण, अल्पसंख्यक समुदायात असुरक्षिततेची भावना या गोष्टीही आपल्या पराभवाला कारण ठरल्याचं ते म्हणाले. दरम्यान, देवेंद्र फडनवीस यांनी सरकारच्या बाहेर पडून काम करण्याची गरज नाही. त्यांनी सरकारमध्ये राहूनच संघटनेला मदत करावी, अशी विनंती आपण फडनवीस आणि केंद्रीय नेतृत्वालाही करणार असल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी वार्ताहर परिषदेत बोलताना सांगितलं.

महायुतीच्या पराभवाची पूर्ण जबाबदारी सर्व पक्षांची एकत्रित आहे. त्यावर एकत्रितरित्या चर्चा करुन तोडगा काढू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. राजीनाम्याच्या निर्णयासंदर्भात फडनवीस यांच्याशी चर्चा करू असंही ते म्हणाले.

<><><><><>

विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघासाठी काँग्रेसनं रमेश कीर यांना उमेदवारी दिली असल्याची माहिती महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज दिली.

मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून दीपक सावंत यांनी आज उमेदवारी अर्ज भरला आहे.

मुंबई शिक्षक मतदार संघासाठी भाजपने शिक्षक परिषदेचे उमेदवार शिवनाथ दराडे यांना पाठिंबा दिल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केली.

विधानपरिषदेच्या नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी आज चार उमेदवारांनी सहा नामनिर्देशन अर्ज सादर केले. जळगावमधून पंडीत गव्हारे यांनी अपक्ष म्हणून अर्ज सादर केला. नाशिकमधून रतन चावला यांनी अपक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असे दोन अर्ज सादर केले. धुळ्यातून महेंद्र भावसार यांनी अपक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असे दोन अर्ज सादर केले आहेत. अहमदनगर मधून दत्तात्रय पानसरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून अर्ज सादर केला. या मतदार संघाचे विद्यमान आमदार किशोर दराडे यांनी काल शिवसेना पुरस्कृत म्हणून अर्ज दाखल केला. शिवसेनेच्या उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने नाशिक विभागातून संदीप गुळवे यांना उमेदवारी दिली आहे. आत्तापर्यंत १९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**<><><><><>**

देशाच्या शेअर बाजारातल्या कालच्या घसरणीला आज थांबवत आज मोठी तेजी नोंदवली. व्यवहार सुरू झाले तेव्हा थोड्याफार प्रमाणात घसरलेल्या शेअर बाजारांनी नंतर तेजीचा रस्ता पकडला आणि दिवसअखेरपर्यंत त्यात वाढच होत गेली. व्यवहार संपले तेव्हा मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स २ हजार ३०३ अंकांची

तेजी नोंदवून ७४ हजार ३८२ स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ७३६ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ६२० अंकांवर बंद झाला. निफ्टी बँकही २ हजार १२६ अंकांची वाढ नोंदवून ४९ हजाराच्यावर बंद झाला.

**<><><><><>**

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री आठ वाजता सामना आयर्लंड सोबतचा सामना न्यूयॉर्क इथं सुरु होईल. या सामन्यांचं थेट समालोचन आकाशवाणीवरून प्रसारित केलं जाणार आहे.

**<><><><><>**

**नांदेड** जिल्ह्यात आज दुपारी देगलूर इथं मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. पावसामुळे शेतकऱ्यांच्या खरीपपूर्व मशागतीला गती मिळणार आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात आज दुपारी पावसाने दमदार हजेरी लावली. कोल्हापूर शहरासह केरले, पन्हाळा, असुर्ले पोर्ले, पेठवडगाव इथं जोरदार पाऊस झाला.

**धुळे** शहरात ही जोरदार पाऊस सुरू आहे.

**सांगली** जिल्ह्यात वाळवा आणि पलूस तालुक्यात आज दुपारी वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस झाला.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढल्या वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल असून, येत्या ३ ते ४ दिवसांत तो मध्य अरबी समुद्र आणि कर्नाटकाचा उर्वरित भाग, दक्षिण महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेशचा किनारपट्टी भाग, छत्तीसगड, ओदिशा, पश्चिम मध्य आणि वायव्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागात पुढे सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल, तर किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.